

दैनिक आकर्षण

संपादक : विजय सांगळे



वर्ष ६ ▪ अंक ४२ ▪ बुधवार ४ नोव्हेंबर २०२६ ▪ पाने ४ मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

मनपा महासभेत पाणी, रस्ते व विकास आराखड्यावरून घमासान

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शहरातील पाणीप्रश्न, धरणातील पाणीसाठा, शहर विकास आराखड्याला उच्च न्यायालयाने दिलेली स्थगिती आणि रस्त्यांच्या प्रश्नांवरून अहिल्यानगर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा चांगलीच गाजली. पाणीटंचाई व दूषित पाणीपुरवठ्यावर नगरसेवकांनी आक्रमक होत प्रशासनाला धारेवर धरले. तर, पथदिव्यांच्या मुद्द्यावरून सभागृहात नगरसेवकांमध्ये खडाजंगीही पाहायला मिळाली.

बुधवारी (दि. ४ नोव्हेंबर) महापौर ज्योतीताई गाडे यांच्या अध्यक्षतेखाली ही महासभा पार पडली. यावेळी आयुक्त यशवंत डांगे, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, उपायुक्त मेहर लहारे उपस्थित होते. सभेच्या सुरुवातीला नाना पाटेकर, भानुदास कोतकर, यश जाधव, आ. कुमार सप्तर्षी आदींसह दिवंगत मान्यवरांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर पाणीप्रश्नावर सविस्तर चर्चा झाली.

निखिल वारे यांनी ग्रामपंचायतींकडील थकबाकी वसुलीचा मुद्दा मांडला. विळद व नांदगाव परिसरात वारंवार जलवाहिन्या फुटण्याचे प्रकार घडत असल्याने यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी सागर बोरुडे यांनी केली. शहाबाज सय्यद, अविनाश घुले, शारदा ढवण यांनीही आपापल्या प्रभागातील अवेळी व दूषित पाणीपुरवठ्याचे प्रश्न मांडले. पाणीप्रश्नावर १८ तारखेला स्वतंत्र सभा घेण्याचे महापौरांनी जाहीर केले. तसेच, अग्निशमन विभागासाठी टर्न टेबल लॅडर खरेदी, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजनेतून ४८८ कोटी रुपयांच्या ४५ रस्त्यांच्या कामांचा डीपीआर, घनकचरा व्यवस्थापनासाठी वाढीव तरतूद आणि माझी वसुंधरा अभियानातून चार उद्याने व सात व्हर्टिकल गार्डन विकसित करण्याचे ठराव सभेने मंजूर केले. सभेच्या उत्तरार्धात मुकुंदनगरमधील पथदिव्यांच्या प्रश्नावरून आणि कामगारांवरील अन्यायाच्या मुद्द्यावरून संपत बारस्कर, सुरेश बनसोडे आणि प्रकाश भागानगरे यांच्यात शाब्दिक चकमक होऊन काही काळ तणाव निर्माण झाला होता.



केडगावच्या प्रश्नावर अधिकाऱ्यांचे धरले पाय!

केडगावला पाणीपुरवठ्यात सापत्न वागणूक दिली जात असल्याचा आरोप करत स्थायी समितीचे माजी सभापती तथा नगरसेवक मनोज कोतकर यांनी संताप व्यक्त केला. प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी त्यांनी थेट अधिकाऱ्यांचे पाय धरले. तर, सहा ते सात दिवसांनी पाणीपुरवठा होतो, हे सुरळीत होत नसेल तर आम्हाला महापालिकेतून काढून टाका, अशी संतप्त भूमिका सुनीता कांबळे व विजय पठारे यांनी मांडली.

गंगा उद्यान चौकात स्व. अरुणकाकांचा पुतळा

गंगा उद्यान चौकात स्वर्गीय आ. अरुणकाका जगताप यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला. महापौर, उपमहापौर यांच्यासह संबंधितांची समिती स्थापन करून पुतळा उभारणी, परवानग्या आणि चौकाला काका चौक नाव देऊन सुशोभीकरण करण्याची प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण केली जाणार आहे.

शहर विकास आराखड्याबाबत न्यायालयात बाजू मांडणार

शहर विकास आराखड्याला उच्च न्यायालयाने दिलेल्या स्थगितीवरून सदस्यांनी प्रशासनाकडे स्पष्टीकरण मागितले. आयुक्तांनी ही केवळ पुढील प्रक्रियेसंदर्भातील अंतरिम स्थगिती असल्याचे सांगत, पुढील सुनावणीत बाजू मांडणार असल्याचे स्पष्ट केले. यावर उच्च न्यायालयात महापालिकेची भक्कम बाजू मांडण्यासाठी चांगल्या वकिलाची नियुक्ती करण्याचे निर्देश महापौरांनी प्रशासनाला दिले.

महिलांचा आवाज जाणीवपूर्वक दाबला जातोय

मयत कंत्राटी कर्मचारी धीरज परदेशी यांच्या कुटुंबीयांना ५० लाख रुपयांची मदत आणि कुटुंबातील एकाला नोकरी देण्याची मागणी सुरेखा कदम यांनी केली. मात्र, अर्ध्या तासापासून उभे राहूनही बोलण्याची संधी न दिल्याने त्यांनी संताप व्यक्त केला. महिलांना जाणीवपूर्वक बोलू दिले जात नाही, आम्ही सत्तेत असताना विरोधकांचा आवाज कधी दाबला नव्हता, असा आरोप त्यांनी केला.

महावितरणला मोफत जागा देण्यास विरोध

आरडीएसएस योजनेत ३३/११ केव्ही विद्युत उपकेंद्रासाठी सावेडी येथे महावितरणला ०.४० आर मोकळी जागा देण्याचा प्रस्ताव आला असता, सदस्यांनी जागा मोफत देण्यास तीव्र विरोध केला. जागेच्या बदल्यात अडीचपट रक्कम मिळावी किंवा बिलातून रक्कम कपात करून घ्यावी, अशी मागणी कुमार वाकळे आणि बाबासाहेब वाकळे यांनी केली. आयुक्तांनी जागा मोफत दिली जाणार नाही, असा खुलासा केल्यानंतर हा विषय मंजूर करण्यात आला.

आरोपींना वाचवण्यासाठी मूळ कागदपत्रेच केली गायब, निवृत्त पोलीस अंमलदारावर गुन्हा दाखल

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– दाखल गुन्ह्याचे दोषारोपपत्र न्यायालयात सादर न करता, गुन्ह्याची मूळ कागदपत्रे स्वतःकडे ठेवून ती नष्ट केल्याचा धक्कादायक प्रकार तोफखाना पोलीस ठाण्यात उघडकीस आला आहे. आरोपींना शिक्षेपासून वाचवण्यासाठी हा प्रताप करणाऱ्या एका निवृत्त पोलीस अंमलदारावर तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य यांनी सरकारतर्फे याप्रकरणी फिर्याद दिली आहे.

दगडू बाबाजी शेरकर (रा. तराळवाडी, ता. पारनेर) असे गुन्हा दाखल झालेल्या निवृत्त पोलीस अंमलदाराचे नाव आहे. तोफखाना पोलीस ठाण्यात २०१३ मध्ये भारतीय दंड विधान कलम ३८५, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता. या गुन्ह्याचा प्राथमिक तपास तत्कालीन सहायक पोलीस निरीक्षक एस. एन. गोगावले यांनी केला. त्यानंतर पुढील तपासाची जबाबदारी अंमलदार दगडू शेरकर यांच्याकडे होती. शेरकर यांनी तपास पूर्ण करून २४ नोव्हेंबर २०१७ रोजी दोषारोपपत्राची स्थळप्रत पोलीस ठाण्यात जमा केली. त्यानंतर हा गुन्हा पोलीस ठाण्याच्या अभिलेखावरून कमी केल्याची नोंद करण्यात आली.

प्रत्यक्षात मात्र, संबंधित गुन्ह्याचे मूळ दोषारोपपत्र न्यायालयात दाखलच झाले नव्हते. त्यामुळे कोर्ट केस क्रमांकही पोलीस दप्तरात नव्हता.

उच्च न्यायालयातील याचिकेमुळे भंडाफोड

सन २०१७ मध्ये कागदोपत्री तपासाची फाईल बंद दाखवून शेरकर यांनी आरोपींना वाचवण्याचा डाव रचला होता. मात्र, मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठातील एका क्रिमिनल रिट याचिकेच्याअनुषंगाने वरिष्ठांनी या गुन्ह्याच्या अभिलेखाची तपासणी करण्याचे आदेश दिले. जुने रेकॉर्ड तपासत असताना दोषारोपपत्र न्यायालयात गेलेच नसल्याची गंभीर बाब समोर आली. या सखोल चौकशीनंतरच तब्बल नऊ वर्षांनी या प्रकरणाचा भंडाफोड झाला.

२४ नोव्हेंबर २०१७ ते २ नोव्हेंबर २०२६ या नऊ वर्षांच्या काळात मूळ दोषारोपपत्र आणि कागदपत्रे न्यायालयात सादर करून फिर्यादीला न्याय मिळवून देणे हे शेरकर यांचे कायदेशीर कर्तव्य होते. मात्र, गुन्ह्यातील आरोपींविरूध्द पुरावा म्हणून ही कागदपत्रे वापरली जाऊ नयेत, आरोपींना फायदा व्हावा आणि त्यांना शिक्षेपासून वाचविता यावे, या उद्देशाने शेरकर यांनी ही कागदपत्रे दडवून ठेवली किंवा नष्ट केली, असा ठपका फिर्यादीत ठेवण्यात आला आहे.

आदित्य ठाकरें कडून शहर शिवसेनेच्या दुष्काळग्रस्त सहाय्यता हेल्पलाइची घोषणा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– राज्यसह अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये दुष्काळजन्य परिस्थिती आहे. शेतकरी मोठ्या संकटाला सामोरा जात आहे. अशा काळामध्ये शिवसैनिकांनी शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे. महानगर प्रमुख किरण काळे यांच्या संकल्पनेतून शहर शिवसेनेच्या वतीने ग्रामीण भागातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी हेल्पलाइन सुरू करण्याचा उपक्रम स्तुत्य आहे, असे प्रतिपादन शिवसेनेचे नेते तथा युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांनी केले.

अहिल्यानगर शहरात आले असतात त्यांचे शहर शिवसेनेच्या वतीने शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित उपस्थित राहत जोरदार स्वागत केले. यावेळी ठाकरे बोलत होते. यावेळी माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, जिल्हा संपर्कप्रमुख आ. सुनील शिंदे, माजी नगरसेवक संजय झिंजे,



उपजिल्हाप्रमुख दीपक भोसले, कामगार शिवसेनेचे जिल्हाप्रमुख विलास उबाळे, अल्पसंख्यांक आघाडीचे अनिस चुडीवाला, रिपब्लिकन पार्टी ऑफ गवई गटाचे शहर प्रमुख सुशांत म्हस्के, विकास भिंगारदिवे, आकाश आल्हाट, राम वाणी, महिला आघाडीच्या उषाताई भगत, नलिनी गायकवाड, शैला लांडे, रत्नमाला वाणी आदींसह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी ठाकरे ▪ पान ४ वर

७५ टक्के अग्निवीरांना सैन्य दलात नोकरीचा मार्ग मोकळा

अतिरिक्त सेवेनंतर मिळणार संधी, केंद्राचा मोठा निर्णय

नवी दिल्ली, वृत्तसंस्था – अग्निवीर योजनेसंदर्भात केंद्र सरकारनं कॅबिनेट बैठकीत मोठा निर्णय घेतला आहे. ७५ टक्के अग्निवीरांना २ वर्ष अतिरिक्त सेवेची संधी देण्याबाबत निर्णय घेण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्राच्या कॅबिनेट बैठकीतील निर्णयांची माहिती केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. अश्विनी वैष्णव आणि चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ यांच्या उपस्थितीत झालेल्या पत्रकार परिषदेत महत्त्वाची माहिती देण्यात आली. अग्निवीर योजनेतील मूळ तरतुदीनुसार २५ टक्के अग्निवीर सैन्य दलात नोकरी मिळवू शकत होते. मात्र, आता या टक्केवारीत वाढ करण्यात आली आहे. आता ती ७५ टक्के केल्याची माहिती सरकारच्यावतीनं देण्यात आली. यासाठी चार वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करणाऱ्या अग्निवीरांचा कार्यकाळ २ वर्षांनी वाढवण्यात येणार आहे.

केंद्र सरकारच्या अग्निवीर योजनेतील मूळ तरतुदीनुसार २५ टक्के अग्निवीर चार वर्षांच्या प्रशिक्षणानंतर सैन्य दलात नियमित नोकरी मिळवू शकतील. तर, उर्वरित ७५ टक्के अग्निवीर तरुणांसाठी भारतीय सैन्य दलांच्या शिफारशींनुसार नवा निर्णय घेण्यात आला आहे. ७५ टक्के अग्निवीर तरुणांमधील चार वर्ष पूर्ण करणाऱ्यांना आणखी २ वर्षांचा कार्यकाळ मिळेल. हा कार्यकाळ पूर्ण केल्यानंतर सर्व अग्निवीर सैन्य दलातील सेवेसाठी पात्र असतील, यासाठी अग्निवीर तरुणांची इच्छा आणि निवड प्रक्रियेतील पात्रतेचं पालन त्यांच्याकडून होणं अपेक्षित असेल.

७५ टक्के अग्निवीरांना २ वर्षांचा अतिरिक्त कार्यकाळ देण्याचा निर्णय विचारपूर्वक, फीडबॅक घेऊन घेण्यात आला आहे. अग्निवीरांच्या आकांक्षा आणि सैन्य दलातील संघटनात्मक सुसज्जता यांचा समन्वय साधण्यासाठी करण्यात आला आहे. केंद्र सरकारच्या या योजनेमुळं सर्व अग्निवीरांना सैन्य दलात नोकरी मिळवण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

अग्निवीरांना दिलासा

अग्निवीर योजना सुरु केल्यानंतर देशातील विविध जिल्हास्तरांवर अग्निवीर भरतीची प्रक्रिया पार पडली. पारदर्शक पद्धतीनं ही भरती प्रक्रिया राबवली गेली. महिलांना सैन्य दलातील विविध विभागांमध्ये नोकरी मिळवण्याचा मार्ग मोकळा झाला. अग्निवीर योजनेमुळं अत्यंत उच्च दर्जाची शारीरिक तंदुरुस्ती, मनोबल, प्रेरणा, स्पर्धात्मक वृत्ती आणि शिस्त यासह सेवेतील कौशल्यवृद्धी, तांत्रिक अनुकूलनक्षमता आणि शिक्षण अग्निवीर जवानांना मिळेल. ७५ टक्के अग्निवीरांनी दोन वर्षांचा अतिरिक्त कालावधी पूर्ण केल्यानंतर त्यांना सैन्य दलात नोकरीत सामावून घेतलं जाईल. ७५ टक्के अग्निवीरांना दोन वर्षांच्या कालावधीत मिळणाऱ्या वेतनात देखील बदल करण्यात येतील. २ वर्षांचा अतिरिक्त कालावधी पूर्ण केल्यानंतर या अग्निवीरांना देखील सैन्य दलात नोकरीची दारं खुली होतील, केंद्रानं यासंदर्भात निर्णय घेतल्यानं अग्निवीरांना दिलासा मिळणार आहे.

अनाहत एक कलासृष्टी आयोजित 'द भक्ती बीट्स भजन जॅमिंग अँड फ्युजन' कार्यक्रमाला रसिकांचा हाऊसफुल्ल प्रतिसाद

देव देश धर्म संकल्पनेतून भक्ती आणि फ्युजन संगीताचा अनोख्या संकल्पनेतून झाले भक्तीगीतांचे सादरीकरण

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– अनाहत एक कलासृष्टी आयोजित 'द भक्ती बीट्स 'भजन जॅमिंग अँड फ्युजन महावीर ग्रुप यांच्या विशेष सहकार्यातून, तसेच विचार भारती आणि समर्थ सत्संग परिवार यांच्या विशेष सहयोगातून या सांगीतिक सोहळ्याचे आयोजन माऊली सभागृह येथे करण्यात करण्यात आले होते.पारंपरिक भारतीय वाद्ये व पाश्चात्य वाद्ये यांचा सुंदर मिलाफ,भक्तिसंगीताचा आध्यात्मिक गंध, भक्तिरसाने ओथंबलेले शब्द आणि आधुनिक संगीताचा दमदार ठेका यांचा अनोखा संगम अनुभवण्याची संधी अहिल्यानगरकरांना मिळाली.

कार्यक्रमाची सुरुवात 'आई गिरी नंदिनी' या देवीच्या भक्तिगीताने झाली. देवीला नमन करून सुरू झालेल्या या मैफलीत पुढे 'हनुमान चालीसा'च्या सादरीकरणाने संपूर्ण सभागृह भक्तिरसात न्हाऊन निघाले. 'मंगल भवन अमंगल हारी' या भगवान श्रीरामांच्या गीताने सभागृहात 'जय श्रीराम'चा जयघोष घुमला. 'राम नाम जप' या गीतालाही रसिकांनी उत्स्फूर्त दाद दिली.'वो कान्हा तेरी बासुरी' या गीतातून भगवान श्रीकृष्णाच्या बासरीचा सुरेल भावविश्व प्रेक्षकांसमोर उभे राहिले. 'ब्रज रस', 'अरे द्वारपालो', 'रामा रामा रटते रटते' आणि 'अवध में राम आए हैं' या गीतांनी रामभक्तीचा उत्कट आविष्कार घडविला. या सादरीकरणांदरम्यान अनेक रसिक मंत्रमुग्ध झाले, तर भक्तिगीतांच्या तालावर सभागृहात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.'ऐसा डमरू बजाया भोलेनाथ ने' आणि 'नमो नमो जी शंकरा' या गीतांच्या सादरीकरणातून भगवान शंकराला संगीतमय वंदन करण्यात आले. त्यानंतर 'कीजो केसरी के लाल', 'श्रीराम जानकी', 'बघ उघडुनी दार' आणि 'हरी म्हणा तुम्ही' या गीतांनी



कार्यक्रमात अधिक रंगत आणली.

समर्थभक्त मंदारबुवा रामदासी,आमदार संग्राम जगताप, उपमहापौर धनंजय जाधव,महावीर ग्रुपच्या विजयाताई भंडारी,चंदूकाका सराफचे गणेश निकम, साईदीप हिरोचे सुधीर चोपडा,नगरसेविका पुष्पाताई बोरुडे,विचार भारतीचे राजाभाऊ मुळे, सुधीर लांडगे, भाजपचे जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, ऍडलॅबचे अविनाश शिरापुरी,अनाहतचे प्रसाद सुवर्णपाठकी, प्रसाद बेडेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत दिपप्रज्वलन करण्यात आले.

उद्घाटनप्रसंगी समर्थभक्त मंदारबुवा रामदासी म्हणाले की, अनाहत एक कलासृष्टीने समाजात भक्तीचे विचार रुजविण्यासाठी मोठे धाडस दाखवत हा अभिनव कार्यक्रम आयोजित केला आहे. अशा सात्त्विक आणि संस्कारक्षम कार्यक्रमांना समाजातून पाठबळ मिळणे आवश्यक आहे. शरीरात देव, दानव आणि मानव या तिन्ही प्रवृत्ती असतात. मानवाकडून देवत्वाकडे जाण्याचा प्रवास या भक्तिसोहळ्यातून अनुभवता येतो. अनाहत नादाचा उंबरठा ओलांडून संगीताच्या माध्यमातून ईश्वराची अनुभूती घेता येते, असे त्यांनी सांगितले. या भक्तिमय उपक्रमाच्या पुढील वाटचालीस त्यांनी शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमात उमेशराज साळुंके, गणेश बैरागी, सौरभ साठे, गौरी रत्नपारखी, महेशराज साळुंके, ज्ञानेश्वर पाठक, विधान बैरागी, भावेश राणे, किर्तेश बाविस्कर, सागर वाघमारे, धनंजय गोहेर, अनिकेत साळुंके आणि यश फुलारे या गायक व वादकांनी आपल्या कलागुणांचे प्रभावी सादरीकरण केले. प्रत्येक कलाकाराने आपल्या सादरीकरणातून भक्तिगीतांना वेगळी उंची दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसाद बेडेकर यांनी विविध दाखले, प्रसंग आणि भक्तिसंगीताशी संबंधित विचार मांडत प्रभावीपणे केले.

भक्तिसंगीत हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून भारतीय संस्कृती, अध्यात्म आणि समृद्ध परंपरेचे महत्त्वपूर्ण प्रतीक आहे. पारंपरिक भजनांमधील भक्तिभाव, भावस्पर्शी शब्द आणि आध्यात्मिक ऊर्जा यांना आधुनिक संगीतशैलीची जोड देत नव्या पिढीला भारतीय भक्तिसंगीताशी ▪ पान ४ वर

दै. आकर्षण निवडक

दि अन्नपूर्णा फूडसच्या तयार दिवाळी फराळाला मोठी मागणी

अहिल्यानगर - केटरिंग व्यवसायात नावाजलेल्या दि अन्नपूर्णा फूडस ॲण्ड इव्हेंटसच्या तयार दिवाळी फराळाला मोठी मागणी आहे. विनायकनगर रोडवरील ज्येष्ठ नागरिक भवनसमोर साईनगर येथे तसेच नगर शहरात घुमरे गल्ली अमृत किराणा शेजारी अन्नपूर्णाच्या रूचकर, स्वादीष्ट आणि घरगुती आपुलकीच्या चवीच्या फराळाची विक्री सुरु आहे. प्रेमाच्या स्वादामुळे फराळ विक्रीला मोठा प्रतिसाद मिळत असल्याचे महेंद्र (बाळू) गुगळे व गौतम गुगळे यांनी सांगितले.तब्बल १० वर्षांपासून केटरिंग व्यवसायात अन्नपूर्णाने ठसा उमटविला आहे. उत्कृष्ट गुणवत्ता, हायजिन आणि घरगुती चव यामुळे अन्नपूर्णाचा दिवाळी फराळ सर्वांच्या पसंतीस उतरत आहे. शुध्द तूपातील मोहनथाल, मोतीचूर लाडू, बेसन लाडू, बालूशाही, गुलाबजामून याठिकाणी आहे. बटरस्कॉच कतली, काजू कतली, केशर कतली, बदामकतली, शुगर फ्री, काजू अंजीर रोल, ड्रायफ्रूट रोज क्रंच, तिरंगा सॅण्डविच, फॅन्सी मिठाई, करंजी, शंकरपाळे या मिठाईना मोठी मागणी आहे. नमकीनमध्ये भाजका पोहा चिवडा, मका पोहा चिवडा, चनादाळ, मूंगदाळ, दाळ मोठ, मसाला शेव, टमाटर शेव, लसून शेव, रतलाम शेव, बाखरवडी, चकली, टेस्टी नटस् ग्राहक आवर्जून खरेदी करीत आहे. संपूर्ण मिठाई, नमकीन चांगल्या गुणवत्तेचे मटेरियल वापरुन तयार करण्यात येते. त्यामुळे शुध्दतेची आणि चवीची हमी मिळते. ग्राहकांनी दिवाळीचा गोडवा वाढविण्यासाठी अन्नपूर्णाच्या फराळाचा आवर्जून आस्वाद घ्यावा, असे आवाहन गुगळे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क ८७८८९९३५४५/९८९०९०४८१८

लिटिल फ्लॉवर प्री स्कूलमध्ये दिवाळी कार्निवल उत्साहात



अहिल्यानगर- सणांचा राजा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दिवाळीची लहान मुलांना खूप उत्सुकता असते नवीन कपडे, फटाके, गोडधोड फराळ, रंगीबेरंगी आकाश कंदिल, पणत्या, सजावट आणि सुटीची धमाल मस्ती याचे आकर्षण असते. लिटिल फ्लॉवर प्री स्कूलच्या सारसनगर शाखेत आयोजित दिवाळी कार्निवल मध्ये चिमुरड्यांनी पालकांसह दिवाळीचा हाच उत्साही माहोल अनुभवला. बोरा एजन्सीचे आनंद बोरा यांच्या हस्ते दीपावली पूजन करण्यात आले. यावेळी शाळेच्या संचालिका मनिषा बोगावत, संचालक विशाल बोगावत यांच्यासह सारसनगर, नवले नगर, ईमारत कंपनी, धर्माधिकारी मळा या चारही शाखांचे विद्यार्थी, पालक व शिक्षक उपस्थित होते.मुलांना नाविन्यपूर्ण उपक्रमातून भारतीय संस्कृती, सण उत्सवांची ओळख करून देण्यासाठी लिटिल फ्लॉवर प्री स्कूल नावाजले जाते. यंदाच्या दिवाळीत शाळेतील मुलांनी शिक्षकांच्या मदतीने स्वत:च्या हातांनी आकर्षक पणत्या, आकाशकंदील, तोरण, सजावटीच्या वस्तू तयार केल्या. त्याचे भव्य प्रदर्शन भरवण्यात आले होते. पालकांनीही मुलांच्या कलाकृतींचे कौतुक करून या वस्तू खरेदी करत मुलांना प्रोत्साहन दिले. कार्निवल मध्ये मुलं आणि पालकांनी विविध खाद्यपदार्थांच्या स्टॉलवर जाऊन मनसोक्त आस्वाद घेतला. यावेळी पपेट शोद्वारे मुलांसमोर संपूर्ण रामायण कथा आकर्षक पद्धतीने सादर करण्यात आली. कार्निवल निमित्त आयोजित दिवाळी पूजा थाली सजावट स्पर्धेत महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या स्पर्धेत प्रथम क्रमांक खुशाली पटेल, द्वितीय क्रमांक प्रिया कोठारी, तृतीय क्रमांक सुरभी भळगट, उत्तेजनार्थ बक्षीस भाविका नारंग, अनिता चोरडिया यांना मिळाले. आनंद बोरा यांच्या हस्ते बक्षीस वितरण झाले. शाळेची माजी विद्यार्थिनी अस्मि आनंद बोरा ही एमबीबीएस उत्तीर्ण होऊन आता छत्रपती संभाजी नगर येथे एम.एस.चे शिक्षण घेत आहे. या कामगिरीबद्दल तिचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला.मनिषा बोगावत यांनी सांगितले की, दिवाळीचा आगळावेगळा आनंदी सोहळा या उपक्रमामुळे सर्वांनी अनुभवला. विविध वस्तू तयार करताना मुलांमधील सृजनशीलता दिसून आली. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर सणाचा आनंद ओसंडून वाहत होता. शाळेच्या चारही शाखांमध्ये नवीन वर्षाची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. तसेच दिवाळीनंतर मदर टॉडलर सुरू होत आहे. प्रवेशासाठी पालकांनी ९८८१९ ४५७८२ या मोबाईल नंबरवर संपर्क साधावा. शेवटी विशाल बोगावत यांनी आभार मानले.

हमालांच्या आरोग्याशी खेळ नको

५० किलोपेक्षा अधिक वजनाची हाताळणी सुरू राहिल्यास राज्यातील बाजारपेठा बेमुदत बंद करू - अविनाश घुले



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– हमाल कष्टकऱ्यांच्या आरोग्याचा आणि सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात ५० किलो वजनाच्या नियमाची काटेकोर अंमलबजावणी करण्यात यावी, या प्रमुख मागणीसाठी अहिल्यानगर जिल्हा हमाल पंचायतीच्या वतीने बाजार समितीच्या कार्यालयासमोर निदर्शने करून निवेदन देण्यात आले . यावेळी हमाल बांधवांनी एकत्र येत प्रशासनाचे लक्ष वेधले. बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या आणि बाहेर जाणाऱ्या मालाचे वजन ५० किलोपेक्षा अधिक असू नये, तसेच या नियमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी बाजार समितीने तातडीने ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी करणारे निवेदन कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव अभय भिसे यांना देण्यात आले. महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळाने राज्यभर केलेल्या आवाहनानुसार हे आंदोलन करण्यात आले.

यावेळी बोलताना जिल्हा हमाल पंचायत अध्यक्ष अविनाश घुले म्हणाले की, बाजारपेठेतील प्रत्येक व्यवहारामागे हमाल कष्टकऱ्यांचे मोठे योगदान असते. शेतकऱ्यांचा शेतमाल बाजार समितीत आणण्यापासून ते त्याची उतराई, भराई, साठवणूक आणि वाहतुकीपर्यंत प्रत्येक टप्प्यावर हमाल कष्टकरी दिवसरात्र मेहनत घेत असतात. मात्र, बाजारपेठेच्या या व्यवस्थेत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या हमालांच्या आरोग्याचा विचार केला जात नाही. ५० किलोपेक्षा अधिक वजनाची पोती उचलण्याची वेळ हमालांवर वारंवार येते. रोजगाराची गरज आणि कुटुंबाच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी यामुळे हमाल कोणतीही तक्रार न करता १०० ते १२० किलोपर्यंतचे वजनही उचलतात. मात्र, या अतिरिक्त श्रमांची किंमत त्यांना पुढील आयुष्यात मोजावी लागते. सतत जड वजन उचलल्यामुळे पाठीचे, मणक्याचे आणि सांध्यांचे विकार वाढत आहेत. सुरुवातीला किरकोळ वाटणारी पाठदुखी पुढे गंभीर स्वरूप धारण करते. वयाच्या ४० ते ४५ वर्षांनंतर अनेक हमालांना या आजारांचा त्रास जाणवू लागतो. उपचारासाठी मोठा खर्च करावा लागतो, तर काहींना शारीरिक क्षमता कमी झाल्यामुळे कायमस्वरूपी रोजगाराला मुकावे लागते. त्यामुळे हमालांच्या आरोग्याचे संरक्षण करण्यासाठी ५० किलो वजनाची मर्यादा पाळणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

घुले पुढे म्हणाले की, ५० किलो वजनाची मर्यादा ही केवळ हमालांची संघटनात्मक मागणी नसून कामगारांच्या आरोग्य आणि सुरक्षिततेशी संबंधित महत्त्वाचा विषय आहे. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने () ५० किलोपेक्षा अधिक वजनाची हाताळणी हमालांकडून करून घेऊ नये, असे निर्देश दिलेले आहेत. या संदर्भात केंद्र सरकारच्या कामगार विभागाने राज्य सरकारांना पत्रव्यवहार केला आहे. तसेच उच्च न्यायालयाचे आदेश, राज्य सरकारच्या कामगार विभागाची पत्रे आणि राज्य पणन संचालकांकडूनही वेळोवेळी सूचना व परिपत्रके जारी करण्यात आली आहेत. महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळानेदेखील या प्रश्नावर सातत्याने शासनाकडे पाठपुरावा केला आहे. असे असतानाही प्रत्यक्ष बाजारपेठांमध्ये या नियमाची प्रभावी अंमलबजावणी होताना दिसत नाही. शासनाचे आदेश आणि परिपत्रके केवळ कागदावर राहून चालणार नाहीत, तर त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. हमाल हा केवळ कामगार नसून तो कुटुंबाचा कर्ता पुरुष किंवा कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा महत्त्वाचा आधार असतो. त्याचे आरोग्य बिघडल्यास त्याचा परिणाम संपूर्ण कुटुंबावर होतो. त्यामुळे या प्रश्नाकडे सामाजिक जबाबदारीच्या भावनेतून पाहिले पाहिजे, असेही त्यांनी नमूद केले.

बाजार समिती प्रशासनाने या प्रश्नावर केवळ निवेदन स्वीकारून थांबू नये, तर त्यासाठी ठोस कृती आराखडा तयार करावा. बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या सर्व गावांचे सरपंच, शेतकरी, व्यापारी, आडते आणि संबंधित घटकांच्या बैठका आयोजित कराव्यात. या बैठकांमध्ये ५० किलो वजनाच्या नियमाचे महत्त्व समजावून सांगावे. शेतमालाची पोती भरताना वजनाची मर्यादा पाळली जावी, यासाठी व्यापारी आणि शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करावी. आवश्यकतेनुसार बाजार समितीच्या वतीने अधिकृत पत्रके काढून त्यांचा प्रसार करावा. बाजार समितीच्या आवारात तसेच संबंधित व्यवहाराच्या ठिकाणी वजन मर्यादेबाबत स्पष्ट सूचना लावाव्यात. नियमांचे उल्लंघन होणार नाही, यासाठी प्रशासनाने नियमित देखरेख ठेवावी. बाजार समितीच्या माध्यमातून शेतकरी, व्यापारी आणि हमाल यांच्यात समन्वय निर्माण केल्यास या प्रश्नावर निश्चितच मार्ग निघू शकतो, असे घुले यांनी सांगितले.

अहिल्यानगर फुटबॉल सुपर लीगसाठी खेळाडूंवर लाखोंची बोली; २० लाखांपर्यंत लिलाव!

नमोह फुटबॉल क्लबच्या पाचव्या सिझनचा थरार २१ व २२ नोव्हेंबरला
१०५ खेळाडूंचा सहभाग, आठ संघांमध्ये रंगणार चुरस



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– शहरातील फुटबॉल खेळाडूंना हक्काचे व्यासपीठ मिळवून देत त्यांच्या क्रीडा कौशल्याला प्रोत्साहन देणाऱ्या अहिल्यानगर फुटबॉल सुपर लीग (ए.एफ.एस.एल.) २०२६ च्या पाचव्या सिझनसाठी खेळाडूंचा लिलाव नुकताच उत्साहात पार पडला. या लिलावात शहरातील गुणवंत फुटबॉलपटूंवर संघमालकांनी लाखो रुपयांची बोली लावली. विशेष म्हणजे, काही खेळाडूंसाठी तब्बल २० लाख रुपयांपर्यंत बोली लागल्याने यंदाच्या स्पर्धेची उत्सुकता अधिकच वाढली आहे.

नमोह फुटबॉल क्लबच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. नमोह फुटबॉल क्लबच्या ओनर नमिता फिरोदिया यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी या स्पर्धेचे आयोजन केले जाते. स्थानिक खेळाडूंना व्यावसायिक पद्धतीने खेळण्याची संधी मिळावी, त्यांच्यातील कौशल्याला प्रोत्साहन मिळावे आणि शहरात फुटबॉल संस्कृती अधिक बळकट व्हावी, हा या स्पर्धेमागील मुख्य उद्देश आहे. यंदा या स्पर्धेचे पाचवे पर्व रंगणार आहे.

शहरात नुकत्याच झालेल्या खेळाडू निवड व लिलाव प्रक्रियेत आठ संघांच्या मालकांनी सहभाग घेत आपल्या पसंतीच्या खेळाडूंना संघात स्थान देण्यासाठी चढाओढ केली. या लिलावाचे सूत्रसंचालन सनीत मुथा यांनी केले. विद्यादान सायन्स अकॅडमी, गुलमोहर स्पोर्ट्स क्लब, नवा मराठा न्यूज, डीइसी बेअरिंग, एमडी अँड आरडीएक्स, प्रॉस्प ऑरा आणि डॉक्टर बायो यांच्या वतीने खेळाडूंसाठी बोली लावण्यात आली.

यंदाच्या स्पर्धेत एमडी अँड आरडीएक्स इन्फ्रा, गुलमोहर चॅलेंजर्स, गांधी वॉरियर्स, डायनामिक स्ट्रायकर, एक्सलन्स अचिव्हर्स, विद्यादान अल्फा एक्स, डॉक्टर बायो आणि नवा मराठा योद्धा असे आठ संघ मैदानात उतरणार आहेत. या संघांमध्ये शहरातील १०५ खेळाडूंचा समावेश असून, प्रत्येक संघाने आपली ताकद वाढविण्यासाठी गुणवंत खेळाडूंची निवड केली आहे.

लिलावामध्ये खेळाडूंवर एक लाख रुपयांपासून ते तब्बल २० लाख रुपयांपर्यंत बोली लावण्यात आली. आयुष गाडळकर, यदुवर कोकरे आणि भार्गव पिंपळे या खेळाडूंवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले. आयुष गाडळकर याच्यासाठी गांधी वॉरियर्स, यदुवर कोकरे याच्यासाठी डायनॅमिक स्ट्रायकर, तर भार्गव पिंपळे याच्यासाठी विद्यादान अल्फा एक्स संघाने सर्वाधिक बोली लावली. या लिलावामुळे स्थानिक फुटबॉलपटूंच्या गुणवत्तेला मिळणारी व्यावसायिक मान्यता आणि त्यांच्या खेळाचे वाढते महत्त्व अधोरेखित झाले आहे.

दरम्यान, स्पर्धेसाठी विजेत्या संघाकरिता तयार करण्यात आलेल्या चषकाचे अनावरण नमिता फिरोदिया यांच्या हस्ते उपस्थित संघमालक आणि त्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत करण्यात आले. या वेळी संघमालक म्हणून ऋत्विक वाबळे, जोएब खान, चेतन गांधी, सिद्धार्थ मुनोत, आशिष टोटू, रोहित रामदिन, सचिन सेलोत, ॲड. ललित गुंदेचा, अभिनंदन आणि रुही भन्साळी यांच्यासह त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

अहिल्यानगर फुटबॉल सुपर लीगचे सामने येत्या २१ व २२ नोव्हेंबर रोजी नगर क्लबच्या मैदानावर रंगणार आहेत. दिवस आणि रात्र अशा दोन सत्रांमध्ये ही स्पर्धा खेळविण्यात येणार असून, फुटबॉलप्रेमींना स्थानिक खेळाडूंचा दमदार खेळ अनुभवता येणार आहे. आठ संघांमधील चुरस, खेळाडूंचे कौशल्य आणि विजेतेपदासाठीची धडपड यामुळे यंदाच्या स्पर्धेत चांगलीच रंगत निर्माण होणार आहे.

या स्पर्धेचे कोपॉवर अभिनंदन आणि रुही भन्साळी (अविन्री मोटशन), किट स्पॉन्सर राजेश भंडारी (महावीर ग्रुप) आणि को स्पॉन्सर प्रणिल मुनोत (कॉनप्लेक्स) आहे. तसेच राम एजन्सी, शिवम सायकल, फन्की लॅण्ड, अमित ट्रेडर्स, जलाराम फुड्स व खेलोफाय यांचे सहकार्य लाभले आहे. स्थानिक खेळाडूंना मोठे व्यासपीठ उपलब्ध करून देणारी ही लीग अहिल्यानगरच्या फुटबॉल विश्वाला नवी दिशा देणारी ठरत आहे.

सुमया शेख यांना 'बेस्ट प्लेअर ऑफ द इयर' पुरस्काराने सन्मानित!

श्री साई इंग्लिश मीडियम स्कूलच्या माजी विद्यार्थिनीच्या यशाचे सर्वत्र कौतुक

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– श्री साई इंग्लिश मीडियम स्कूलच्या माजी विद्यार्थिनी सुमया शेख यांना महाराष्ट्र राज्य वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशनतर्फे उत्कृष्ट खेळाडू म्हणून सन २०२६-२७ च्या 'बेस्ट प्लेअर ऑफ द इयर' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच त्यांची शिवछत्रपती प्रबोधिनी, बालेवाडी येथे प्रशिक्षणासाठी निवड झाली आहे. पुरस्कार आणि प्रशिक्षणासाठी झालेल्या या निवडीमुळे सुमया यांनी फुटबॉल क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे.



सुमया शेख यांच्या या यशामागे त्यांची मेहनत, खेळाप्रती असलेली निष्ठा आणि सातत्यपूर्ण सराव महत्त्वाचा ठरला आहे. त्यांच्या या कामगिरीमुळे अहिल्यानगरच्या क्रीडा क्षेत्राचा गौरव झाला असून, नवोदित खेळाडूंनाही प्रेरणा मिळाली आहे.

या यशासाठी श्री साई इंग्लिश मीडियम स्कूल संस्थेचे अध्यक्ष अशोक कानडे, उपाध्यक्ष नंदकिशोर भावसार, मुख्याध्यापिका अरुंधती भोकरे, माधवी जकल तसेच प्रशिक्षक प्रसाद पांडुळे, संजय गायकवाड आणि मंदा ताथेड यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

सुमया शेख यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल आणि शिवछत्रपती प्रबोधिनी, बालेवाडी येथे प्रशिक्षणासाठी झालेल्या निवडीबद्दल संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक, प्रशिक्षक, विद्यार्थी आणि पालकांकडून त्यांचे अभिनंदन होत आहे.

कर्मचारी संघटन वाढ व विस्तार हेच ध्येय – कॉम्रेड अजित झगडे

कॉम्रेड अजित झगडे यांची विभागीय सचिवपदी पुन्हा बिनविरोध फेरनिवड



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– ऑल इंडिया एम्प्लॉईज युनियन ग्रुप डिव्हिजन, पुणे या संघटनेचे ४६ वे द्विवार्षिक अधिवेशन नुकतेच अहिल्यानगर, केडगाव येथील हॉटेल रंगोली येथे उत्साहपूर्ण व संघटनात्मक वातावरणात पार पडले. या अधिवेशनात आगामी कार्यकाळासाठी विभागीय सचिवपदी कॉम्रेड अजित झगडे यांची पुन्हा एकदा बिनविरोध फेरनिवड करण्यात आली. त्यांच्या नेतृत्वावर, संघटनात्मक कार्यावर आणि कर्मचारी हितासाठीच्या संघर्षशील भूमिकेवर सभासदांनी पुन्हा एकदा विश्वास व्यक्त केला आहे.

कॉम्रेड अजित झगडे हे गेल्या अनेक वर्षांपासून पोस्टल कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांसाठी सातत्याने कार्यरत आहेत. मागील दोन वर्षांपासून विभागीय सचिव म्हणून त्यांनी प्रभावीपणे जबाबदारी सांभाळली आहे. पुणे, अहिल्यानगर, सोलापूर व लातूर या कार्यक्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या समस्या प्रशासनासमोर मांडून त्या सोडविण्यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. अभ्यासू, संयमी, निर्भीड आणि सर्वसामान्य कर्मचाऱ्यांशी थेट संवाद साधणारे नेतृत्व म्हणून त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

विशेषतः / रद्द करून जुनी पेन्शन योजना लागू करण्याच्या मागणीसाठी कर्मचाऱ्यांमध्ये जनजागृती करणे, व विभागाचे संरक्षण, कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित सेवा विषयक समस्या, कार्यालयीन पायाभूत सुविधांचा अभाव, मनुष्यबळाची कमतरता तसेच कर्मचारी हिताच्या विविध न्याय्य मागण्यांसाठी त्यांनी संघटनात्मक पातळीवर प्रभावी भूमिका बजावली आहे. केवळ मागण्या मांडण्यापुरते मर्यादित न राहता प्रशासनाशी सातत्यपूर्ण पाठपुरावा करून अनेक प्रश्न मार्गी लावण्यातही त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले आहे. त्यांच्या याच कार्याची दखल घेत सभासदांनी पुन्हा एकदा त्यांच्यावर विभागीय सचिवपदाची जबाबदारी सोपविली आहे.

या अधिवेशनात विभागीय अध्यक्षपदी कॉम्रेड उमाकांत वालगुडे, विभागीय सचिवपदी कॉम्रेड अजित झगडे आणि विभागीय खजिनदारपदी कॉम्रेड अशोक दळवे यांची फेरनिवड करण्यात आली.

वायदंडे हत्या प्रकरणातील आरोपींना तातडीने अटक करा

दलित महासंघाचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन; संबंधित पोलीस अधिकाऱ्याच्या निलंबनाचीही मागणी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यातील राजेंद्र वायदंडे यांच्या मुलाच्या मृत्यू प्रकरणात संबंधित आरोपींना तातडीने अटक करून खुनाचा गुन्हा दाखल करावा, तसेच तपासात निष्काळजीपणा केल्याचा आरोप असलेल्या एपीआय खुणे यांच्यावर निलंबनाची कारवाई करावी, अशी मागणी दलित महासंघाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन करण्यात आली.



निवेदनात नमूद केल्यानुसार, मातंग समाजातील राजेंद्र वायदंडे यांच्या मुलाचा काही तरुणांशी वाद झाला होता. त्यानंतर सागर साळुंखे व त्याच्या साथीदारांनी वायदंडे यांच्या घरी जाऊन त्यांच्या मुलाला ताब्यात देण्याची मागणी केली. तसेच मुलाला ताब्यात न दिल्यास कुटुंबीयांना उचलून नेण्याची धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यानंतर संबंधित युवकाला जबरदस्तीने घरातून नेऊन मारहाण करण्यात आली व विष पाजून त्याची हत्या करण्यात आल्याचा गंभीर आरोप कुटुंबीयांनी केला आहे.

या प्रकरणी कुटुंबीय पोलिसांत तक्रार देण्यासाठी गेले असता, हा खून नसून आत्महत्या असल्याचे चित्र निर्माण करण्यात आल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे. युवकाने आत्महत्या केली असेल, तर त्याच्या शरीरावर मारहाणीच्या खुणा कशा आल्या? तसेच त्याचा मृतदेह आरोपी सागर साळुंखे यांच्या हॉटेलजवळ कसा आढळला, असे सवालही उपस्थित करण्यात आले आहेत.

कुटुंबीयांच्या म्हणण्यानुसार, त्यांच्या तक्रारीप्रमाणे खुनाचा गुन्हा दाखल न करता आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. स्थानिक नेत्यांच्या दबावामुळे पोलिसांनी योग्य कारवाई केली नसल्याचा आरोपही करण्यात आला आहे. घटनेला दहा दिवस उलटूनही गुन्हा दाखल असताना एकाही आरोपीला अटक करण्यात आलेली नाही. उलट भांडण सोडविण्यासाठी गेलेल्या एका निर्दोष व्यक्तीला तत्परतेने अटक करण्यात आल्याचा आरोप महासंघाने केला आहे.

या प्रकरणातील आरोपी सागर साळुंखे व त्याच्या साथीदारांना पाठीशी घालण्याचे काम होत असल्याचा आरोप करत, पोलीस प्रशासनाच्या भूमिकेवर दलित महासंघाने प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. वायदंडे कुटुंबीयांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रकरणाचा निष्पक्ष तपास करावा, आरोपींवर खुनाचा गुन्हा दाखल करून त्यांना तातडीने अटक करावी आणि कर्तव्यात कसूर केल्याचा आरोप असलेल्या एपीआय खुणे यांच्यावर निलंबनाची कारवाई करावी, अशा मागण्या निवेदनाद्वारे करण्यात आल्या.

यावेळी दलित महासंघाचे प्रदेशाध्यक्ष डॉ. काशिनाथ सुलाखे पाटील, जिल्हाध्यक्ष संजय चांदणे, कडूबाबा लोंढे, वरुण वाघमारे, चंद्रकांत सकट, आकाश लोखंडे, गणेश अडागळे यांच्यासह महासंघाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा
फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)
The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

दै. आकर्षण निवडक

चित्रपट महर्षी दादासाहेब फाळके जयंतीनिमित्त डोंगरे यांना सन्मान कलावंतांचा पुरस्कार प्रदान

अहिल्यानगर- सामाजिक क्षेत्रात सातत्याने विविध विधायक उपक्रम राबवून ग्रामीण विकासासाठी योगदान देणारे अहिल्यानगरचे सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे यांना चित्रपट महर्षी दादासाहेब फाळके जयंतीनिमित्त दिला जाणारा सन्मान कलावंतांचा पुरस्कार' प्रदान करण्यात आला. नाशिक येथे आयोजित कार्यक्रमात अभिनेत्री शिल्पा शाहीर यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला.कलावंत विचार मंच, नाशिक आणि कमल फिल्म प्रोडक्शन, कमल म्युझिक मराठी यांच्या संयुक्त विद्यमाने हा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. म.सा. नाट्यगृह, पंडित नेहरू गार्डन, शालिमार, नाशिक येथे झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कवयित्री जयश्री वाघ होत्या. यावेळी स्वागताध्यक्ष सुनील मोफ्लढे, अभिनेत्री श्रुती देशमुख, कवी संजय आहेर, आनंदा साळवे, शाहीर सुनील चिंचोळीकर आदी उपस्थित होते.पै. नाना डोंगरे हे स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष असून ग्रामपंचायत सदस्य म्हणूनही कार्यरत आहेत. नगर तालुक्यासह अहिल्यानगर जिल्ह्यात त्यांनी सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा, साहित्यिक आणि धार्मिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले आहे.

दिवाळीआधीच किंग्स मेन्स वेअर कडून ग्राहकांना बक्षिसांची पर्वणी!



अहिल्यानगर - सणासुदीच्या काळात कपड्यांच्या खरेदीसोबत आकर्षक बक्षिसे जिंकण्याची संधी मिळाल्यास ग्राहकांचा आनंद द्विगुणित होतो. हाच अनुभव अहिल्यानगरच्या कापड बाजारातील तेली खुंट परिसरातील किंग्स मेन्स वेअर या दालनाच्या माध्यमातून ग्राहकांना मिळत आहे. ग्राहकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या विशेष लकी ड्रॉ उपक्रमाची पहिली सोडत २ नोव्हेंबर रोजी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या सोडतीमध्ये वॉशिंग मशीन, टीव्ही, सायकल, होम थिएटर यांसह एकूण १२ आकर्षक बक्षिसांचा समावेश होता.ग्राहकांना खरेदीचा आनंद देण्यासोबतच त्यांच्यासाठी काहीतरी विशेष करण्याच्या उद्देशाने किंग्स मेन्स वेअरचे संचालक निखिल क्षेत्रे आणि सागर परदेशी यांनी या लकी ड्रॉ उपक्रमाचे आयोजन केले आहे. या स्पर्धेत दालनातून ५०० रुपयांपासून पुढे खरेदी करणाऱ्या ग्राहकांना सहभागी होण्याची संधी देण्यात आली होती. त्यामुळे दिवाळीच्या खरेदीदरम्यान ग्राहकांना खरेदीसोबत बक्षिसे जिंकण्याचीही संधी उपलब्ध झाली. संचालक निखिल क्षेत्रे आणि सागर परदेशी यांच्या उपस्थितीत पहिल्या लकी ड्रॉची सोडत काढण्यात आली. विशेष म्हणजे, या सोडतीमध्ये पारदर्शकता राहावी आणि ग्राहकांनाही संपूर्ण प्रक्रिया पाहता यावी, यासाठी लकी ड्रॉचे थेट प्रक्षेपण () करण्यात आले. ग्राहकांच्या हस्ते सोडत काढण्यात आल्याने या उपक्रमाला विशेष स्वरूप प्राप्त झाले.या लकी ड्रॉमध्ये प्रथम क्रमांकासाठी वॉशिंग मशीन, द्वितीय क्रमांकासाठी टीव्ही, तृतीय क्रमांकासाठी सायकल, तर चौथ्या क्रमांकासाठी होम थिएटर अशी आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली होती. याशिवाय इतरही भेटवस्तूंचा समावेश असून, एकूण १२ बक्षिसांच्या माध्यमातून ग्राहकांना आनंदाची संधी देण्यात आली.

विद्यार्थ्यांच्या माणुसकीच्या दिव्यांनी गरजूंची दिवाळी उजळली!

भिंगारच्या विश्वशंकर प्राथमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा गरजू कुटुंबांना जीवनावश्यक साहित्याचे वाटप । स्वत:च्या आनंदासोबत गरजूंनाही दिला दीपावलीचा आनंद

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– दीपावली म्हणजे आनंद, उत्साह, प्रकाश आणि मांगल्याचा सण! मात्र समाजातील प्रत्येक घटकाला हा सण आनंदाने साजरा करता येतोच असे नाही. आर्थिक परिस्थितीमुळे अनेक गरजू कुटुंबांना सणाच्या आनंदापासून वंचित राहावे लागते. अशा कुटुंबांच्या जीवनातही दीपावलीचा आनंद फुलावा, या उदात्त भावनेतून रयत शिक्षण संस्थेच्या विश्वशंकर प्राथमिक विद्यालय, भिंगार येथील विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी जपत गरजूंना दीपावलीनिमित्त जीवनावश्यक वस्तूंचे वाटप केले.

दीपावलीच्या सणानिमित्त केवळ स्वतःच्या घरात आनंद साजरा न करता समाजातील वंचित आणि गरजू घटकांच्याही जीवनात आनंदाचा प्रकाश पोहोचविण्याचा संकल्प विद्यार्थ्यांनी केला. त्यानुसार विद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांच्या मदतीने तसेच स्वतः पुढाकार घेऊन दीपावलीसाठी आवश्यक असणाऱ्या विविध वस्तू जमा केल्या. त्यानंतर शिक्षकांसमवेत विद्यार्थ्यांनी अहिल्यानगर शहरातील डीएसपी चौक, स्टेट बँक चौक तसेच रेल्वे स्टेशन परिसरात जाऊन गरजू व वंचित नागरिकांना या साहित्याचे वाटप केले. विद्यार्थ्यांच्या या संवेदनशील कृतीमुळे अनेक गरजूंच्या चेहऱ्यावर आनंद आणि समाधानाचे हास्य फुलले.

हा सामाजिक उपक्रम संस्थेच्या रितू दीदी ॲबट यांच्या प्रेरणेने, स्थानिक स्कूल कमिटी सदस्य इंजि. विजय बेरड यांच्या उपस्थितीत, सहाय्यक विभागीय अधिकारी प्रमोद तोरणे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच नारायण अनभुले यांच्या संकल्पनेतून उत्साहात पार पडला. या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी प्राथमिक विभागातील सौ. प्रतिभा पाठक, सौ. मनिषा गवळी, श्रीम.भाग्यश्री धोंडे, सौ. ज्योती शेळके, श्रीम.रंजिता गलांडे आणि श्री. विजय कासार यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच माध्यमिक विद्यालयाच्या पर्यवेक्षिका श्रीमती कविता शिंदे, प्रदीप पाडळे, श्रीम.क्रांती घायतडक आणि श्रीम.जयश्री मोरे यांनीही विद्यार्थ्यांसह प्रत्यक्ष उपस्थित राहून साहित्य वाटपाच्या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदविला.

या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना केवळ गरजू व्यक्तींना वस्तूंचे वाटप करण्याचा अनुभव मिळाला नाही, तर समाजातील वंचित घटकांच्या अडचणी समजून घेण्याची संधीही मिळाली. दुसऱ्यांच्या दुःखाची जाणीव ठेवणे, गरजूंच्या मदतीला धावून जाणे, सहकार्याची भावना जोपासणे आणि सामाजिक उत्तरदायित्व स्वीकारणे अशा महत्त्वपूर्ण मूल्यांची रुजवणूक विद्यार्थ्यांमध्ये झाली.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पुस्तकी ज्ञानाबरोबरच सामाजिक आणि नैतिक मूल्यांचे संस्कार होणे आवश्यक आहे. याच विचारातून राबविण्यात आलेला हा उपक्रम विद्यार्थ्यांना माणुसकीचा प्रत्यक्ष धडा देणारा ठरला. 'दुसऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविणे, हीच खऱ्या अर्थाने दीपावली!' हा माणुसकीचा सुंदर संदेश देत विश्वशंकर प्राथमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आपल्या कृतीतून दीपावलीचा खरा साजरा केला.

माळीवाडा वेशीतील महात्मा फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे काम तातडीने सुरू करा

परिसरातील बेकायदेशीर अतिक्रमणे १५ नोव्हेंबरपर्यंत हटविण्याची कृती समितीची मागणी



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– माळीवाडा वेशीतील क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या अर्धाकृती पुतळ्याच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर अतिक्रमणे झाली आहेत. क्रांतीज्योती सावित्रीबाई व महात्मा ज्योतिराव फुले यांचे लहान बालकांसह पूर्णाकृती पुतळे उभारण्याचे नियोजन असून, या कामात अतिक्रमणांमुळे अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे परिसरातील सर्व बेकायदेशीर अतिक्रमणे तातडीने हटवून पुतळे उभारणीचे काम सुरू करावे, अशी मागणी क्रांतीज्योती सावित्रीबाई महात्मा ज्योतिबा फुले कृती समितीच्या वतीने महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली. तसेच १५ नोव्हेंबर २०२६ पर्यंत अतिक्रमणे न हटविल्यास १६ नोव्हेंबरपासून बेमुदत आमरण उपोषण करण्याचा इशाराही समितीने दिला आहे.

माळीवाडा वेशीमध्ये क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांचा अर्धाकृती पुतळा आहे. या पुतळ्याच्या अवतीभोवती मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर अतिक्रमणे झाली आहेत. अहिल्यानगर शहराचे आमदार संग्रामभैय्या अरुणकाका जगताप यांच्या पुढाकाराने आणि अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने या ठिकाणी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व महात्मा ज्योतिराव फुले यांचे लहान बालकांसह पूर्णाकृती पुतळे उभारण्यात येणार आहेत.

या पुतळ्यांच्या उभारणीचे भूमिपूजन महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या शुभहस्ते, तसेच अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते आणि आमदार संग्रामभैय्या अरुणकाका जगताप व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत रविवार, दि. २७ जुलै २०२५ रोजी संपन्न झाले होते. मात्र, भूमिपूजन होऊनही अद्याप प्रत्यक्ष कामाला सुरुवात झालेली नाही.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, माळीवाडा वेशीच्या परिसरातील बेकायदेशीर अतिक्रमणे हटविल्याशिवाय पूर्णाकृती पुतळे उभारणे आणि परिसराचे सुशोभीकरण करणे शक्य होणार नाही. त्यामुळे महापालिकेने यापूर्वीही करण्यात आलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेऊन अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही तातडीने करावी. पुतळे उभारणीचे काम रखडू नये, यासाठी प्रशासनाने विलंब न करता आवश्यक पावले उचलावीत, अशी मागणी कृती समितीने केली आहे.

महापालिकेने १५ नोव्हेंबर २०२६ पर्यंत सर्व बेकायदेशीर अतिक्रमणे हटवून पुतळे उभारणीच्या कामाला गती द्यावी. निर्धारित मुदतीत कार्यवाही न झाल्यास सोमवार, दि. १६ नोव्हेंबर २०२६ पासून माळीवाडा वेशी येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई महात्मा ज्योतिबा फुले कृती समिती आणि अहिल्यानगर सकल माळी समाज संस्थेच्या वतीने बेमुदत आमरण उपोषण सुरू करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.

या मागणीचे निवेदन महापौर ज्योतीताई गाडे उपमहापौर एडवोकेट धनंजय जाधव स्थायी समितीचे सभापती पै, सुभाष लोंढे आयुक्त यशवंत डांगे यांना देण्यात आले. यावेळी त्यांनी शिष्टमंडळाशी चर्चा करत दिवाळीनंतर परिसरातील अतिक्रमणे हटविण्याची कार्यवाही करण्यात येईल आणि क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या उभारणीचे काम सुरू करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

शिक्षक होण्याची स्वप्ने पाहणाऱ्या विद्यार्थ्यांना टीईटी, सीटीईटी व टीएआय परीक्षांचे मार्गदर्शन

करिअर कट्टाअंतर्गत डॉ. एन. जे. पाअुलबुधे कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये मारुती शेळके यांचे व्याख्यान

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– शिक्षक होण्याचे स्वप्न उराशी बाळगणाऱ्या विद्यार्थ्यांना अध्यापन क्षेत्रातील करिअरच्या संधींची माहिती मिळावी, तसेच शिक्षक पात्रता व भरती प्रक्रियेसाठी आवश्यक असलेल्या विविध प्रवेश परीक्षांची प्रभावी तयारी करता यावी, या उद्देशाने सेवा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित डॉ. एन. जे. पाअुलबुधे कॉलेज ऑफ एज्युकेशन, अहिल्यानगर येथे करिअर कट्टाअंतर्गत विशेष मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. (अध्यापन व्यवसाय आणि प्रवेश परीक्षांची तयारी) या विषयावर शेळके मास्टर माइंड अॅकॅडमीचे संचालक मारुती शेळके यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

या व्याख्यानामध्ये मारुती शेळके यांनी शिक्षक होण्यासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक पात्रता, अध्यापन व्यवसायाचे स्वरूप, शिक्षक भरती प्रक्रियेतील विविध टप्पे आणि उपलब्ध करिअरच्या संधी याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विशेषतः , व या महत्त्वपूर्ण परीक्षांचे स्वरूप, परीक्षेची पात्रता, प्रश्नपत्रिकेचा पॅटर्न, अभ्यासक्रम, गुणांकन पद्धती, तयारीचे नियोजन आणि उपयुक्त अध्ययन साहित्य याबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिली.

स्पर्धा परीक्षांची तयारी करताना अभ्यासाचे योग्य नियोजन, विषयानुसार वेळेचे व्यवस्थापन, नियमित सराव, मागील वर्षांच्या प्रश्नपत्रिकांचा अभ्यास आणि परीक्षेच्या स्वरूपानुसार तयारी करणे किती महत्त्वाचे आहे, हे त्यांनी विविध उदाहरणांच्या माध्यमातून स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनी परीक्षांकडे केवळ गुण मिळविण्याचे साधन म्हणून न पाहता शिक्षक होण्याच्या ध्येयाकडे वाटचाल करण्याची संधी म्हणून पाहावे, असेही त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून होत असलेल्या शिक्षक भरतीच्या पार्श्वभूमीवर या व्याख्यानाला विशेष महत्त्व प्राप्त झाले होते. अध्यापन क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मनातील विविध प्रश्नांचे निरसन होण्यास या मार्गदर्शनाचा लाभ झाला. शिक्षक पात्रता परीक्षा आणि शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणीच्या तयारीसाठी आवश्यक असलेली दिशा या व्याख्यानातून विद्यार्थ्यांना मिळाली.

या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष विनय पाअुलबुधे, उपाध्यक्ष रामभाऊ बुचकुल, संस्थेचे संचालक साई पाअुलबुधे, सचिव रामकिसन देशमुख, खजिनदार दादासाहेब भोईटे, तज्ञ संचालक डॉ. रेखाराणी खुराना, रघुनाथ कारमपुरी, विनायक मच्चा, बी.एड. विभागाच्या प्राचार्य डॉ. प्राची मचे तसेच मास्टर माइंड शिष्यवृत्ती विभागाचे नवनाथ गिते, तांत्रिक विभाग प्रमुख मास्टर माइंड अॅकॅडमीचे सुरज घोगरे आणि डॉ. एन. जे. पाऊलबुधे रात्र महाविद्यालयाचे प्राचार्य संदीप कांबळे यांनी विशेष उपस्थिती दर्शविली. तसेच डॉ. एन. जे. पाअुलबुधे, डी. एड. विद्यालयाच्या प्राचार्य सविता सानप, डॉ. एन. जे. पाअुलबुधे, महिला महाविद्यालयाच्या प्राचार्य सुचित्रा डावरे, कार्यालयीन कर्मचारी आणि शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य केले.

या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. स्मिता चासकर यांनी केले. प्रा. अमृता रत्नपारखी यांनी सूत्रसंचालन केले, तर प्रा. उज्वला आंबेडकर यांनी उपस्थित पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. अर्पणा केसकर यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी पूर्ततेसाठी प्रा. मृदुला गोरे, प्रा. संध्या यादव, प्रा. सविता पवार आणि प्रा. वसुधा देशपांडे यांनी मोलाचे सहकार्य केले.

दिवाळी तोंडावर, पण पणत्या विक्रेत्यांकडे ग्राहकांची पाठ

उन्हात बसून व्यापारी पाहताहेत ग्राहकांची वाट; बाजारपेठेत अपेक्षित गर्दी नसल्याने व्यवसायावर मंदीचे सावट



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

पैठण– दिवाळीचा सण अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असतानाही पैठण शहरातील बाजारपेठेत पणत्या, दिवे आणि पूजेचे साहित्य विक्रीसाठी मांडलेल्या छोट्या व्यापाऱ्यांना अद्याप ग्राहकांची प्रतीक्षा करावी लागत आहे. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर मोठ्या आशेने माल खरेदी करून विक्रीसाठी बसलेल्या व्यापाऱ्यांच्या पदरी मात्र निराशा पडत असल्याचे चित्र दिसत आहे.

शहरातील रस्त्याच्या कडेला पणत्या, आकर्षक रंगीबेरंगी दिवे आणि लक्ष्मीमातेच्या मूर्ती विक्रीसाठी मांडण्यात आल्या आहेत. मात्र ग्राहकांची वर्दळ कमी असल्याने व्यापारी दिवसभर उन्हात बसून ग्राहकांची वाट पाहत आहेत. सणासुदीच्या काळात होणारी अपेक्षित उलाढाल यंदा दिसत नसल्याने छोट्या व्यावसायिकांसमोर आर्थिक अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे.

दिवाळीचा सण आनंदाचा आणि प्रकाशाचा असला तरी बाजारपेठेतील मंदीमुळे पणत्या विक्रेत्यांच्या चेहऱ्यावर मात्र चिंतेचे सावट दिसत आहे. माल विकला गेला नाही तर गुंतवलेले भांडवल कसे निघणार, या विवंचनेत छोटे व्यापारी असल्याचे चित्र आहे.

शहरात पाडव्याला लग्न रेषा माहिती चित्रपटाचे ऑडिशन

। मुलींचा जन्मदर वाढविणे, स्त्रीभ्रूणहत्या रोखणे आणि मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्याचा उद्देश । ९ नोव्हेंबरला जाधव लॉन्स येथे ऑडिशन देण्याचे आवाहन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– मुलगा आणि मुलगी यांच्यातील भेदभाव दूर करून मुलींच्या जन्माचे स्वागत व्हावे, स्त्रीभ्रूणहत्येला आळा बसावा आणि मुलींच्या शिक्षणाबाबत समाजात सकारात्मक दृष्टिकोन निर्माण व्हावा, या सामाजिक उद्देशाने 'लग्न रेषा' या माहितीपटाची निर्मिती करण्यात येणार आहे. जय युवा अॅकॅडमी, अॅक्शन फॉर वेल्फेअर डेव्हलपमेंट असोसिएशन आणि स्वप्नपूर्ती क्रिएशन मूव्ही कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने हा सामाजिक आशयाचा माहितीपट साकारण्यात येत आहे. या माहितीपटासाठी पाडव्याच्या मुहूर्तावर अर्थात ९ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजल्यापासून अहिल्यानगरमधील कल्याण रोड येथील जाधव लॉन्स येथे कलाकार निवडीसाठी ऑडिशन घेण्यात येणार आहे. अशी माहिती दिग्दर्शक तुषार रणनवरे, निर्माते प्रा. डॉ. रमेश वाघमारे आणि ॲड. महेश शिंदे यांनी दिली.

समाजात आजही काही ठिकाणी मुलगा आणि मुलगी यांच्यात भेदभाव केला जात असल्याचे चित्र दिसून येते. विशेषतः काही कुटुंबांमध्ये मुलीच्या जन्माबाबत नकारात्मक मानसिकता असून, मुलगा-मुलगी समानतेचा विचार अद्याप सर्व स्तरांपर्यंत प्रभावीपणे पोहोचलेला नाही. ही मानसिकता बदलण्यासाठी केवळ कायदे आणि नियम पुरेसे नसून समाजाच्या विचारांमध्ये परिवर्तन घडवून आणणे गरजेचे आहे. मुलींच्या जन्माचे आनंदाने स्वागत करणे, स्त्रीभ्रूणहत्या रोखणे, महिलांचे आरोग्य जपणे आणि मुलींना शिक्षणाच्या समान संधी उपलब्ध करून देणे, या विषयांवर व्यापक जनजागृती होणे आवश्यक आहे.

याच सामाजिक जाणिवेतून 'लग्न रेषा' या माहितीपटाची संकल्पना पुढे आली आहे. मनोरंजनाच्या माध्यमातून समाजाला विचार करायला लावणारा आणि सामाजिक प्रश्नांबाबत सकारात्मक परिवर्तन घडविण्यास प्रेरणा देणारा हा माहितीपट संपूर्ण महाराष्ट्रात लोकचळवळीच्या स्वरूपात पोहोचविण्याचा प्रयत्न राहणार आहे. मुलींच्या अस्तित्वाचा सन्मान, स्त्री-पुरुष समानता आणि समाजातील जुनाट विचारसरणीत बदल घडविण्याचा संदेश या माध्यमातून दिला जाणार असल्याचे ॲड. महेश शिंदे यांनी सांगितले.

या माहितीपटासाठी चार ते साठ वर्षे वयोगटातील महिला व पुरुष कलाकारांना संधी देण्यात येणार आहे. डॉक्टर, वकील, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका, ग्रामस्थ, गावातील प्रमुख व प्रतिष्ठित व्यक्ती, प्रमुख भूमिकेतील स्त्री-पुरुष कलाकार, सहाय्यक कलाकार, खलनायक, बालकलाकार तसेच युवक-युवती अशा विविध भूमिकांसाठी कलाकारांची निवड केली जाणार आहे. त्यामुळे अभिनयाची आवड असणाऱ्या नवोदितांसह अनुभवी कलाकारांनाही या सामाजिक उपक्रमात सहभागी होण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

इच्छुक कलाकारांनी ९ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता कल्याण रोड येथील जाधव लॉन्स, अहिल्यानगर येथे उपस्थित राहून ऑडिशन द्यावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. या सामाजिक माहितीपटाच्या निर्मितीसाठी राजेंद्र उदागे, ॲड. अनिता दिघे, आरती शिंदे, प्रतिभा गांधी, रोहिणी थोरात, पूजा बनकर, जयश्री शिंदे, भाऊसाहेब पादीर, बाळासाहेब शिंदे, राजकुमार चिंतामणी, संतोष लयचेट्टी आणि ॲड. दिनेश शिंदे आदी प्रयत्नशील आहेत. अधिक माहितीसाठी ९८२२९७४९२३ व ९९२१८१००९६ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे सांगण्यात आले आहे.

दिवाळी हा केवळ रोषणाईचा किंवा फराळाचा सण नसून तो आनंद वाटण्याचा आहे - डॉ. मंजिरी झेंडे

बालगृहातील मुलांसोबत घेतला दिवाळीचा आनंद आयएमए लेडीज विंगच्या वतीने बालगृहातील मुलांना मिठाई व दिवाळी साहित्याचे वाटप



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– दिवाळीच्या आनंदोत्सवात गोरगरीब व निराधारांना सामावून घेत अहिल्यानगर येथील निरीक्षणगृह व बालगृहामध्ये आयएमए लेडीज विंगच्या वतीने दिवाळीनिमित्त विंगच्या अध्यक्षा मंजिरी झेंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत फराळ, मिठाई व दिवाळी साहित्याचे तसेच नवजात शिशु बालगृहातील चिमुकल्यांसाठी फॉर्म्युला मिल्कचे वाटप करण्यात आले.या प्रसंगी बालगृहातील मुलांशी संवाद साधताना डॉ.मंजिरी झेंडे म्हणाल्या की आम्ही आमच्या कुटुंबासोबत दिवाळी साजरी करतोच परंतु तुमच्यासारख्या मुलांसोबत दिवाळी साजरी करण्यात एक वेगळाच आनंद मिळतो .बालगृहातील मुलांनी आपले भविष्यातील उच्च स्वप्न उंचावून ते पूर्ण करावेत आणि मोठे होऊन समाजातील वंचित घटकांना करावी.दिवाळी हा केवळ रोषणाईचा किंवा फराळाचा सण नसून तो आनंद वाटण्याचा आहे असे असे प्रतिपादन डॉ.मंजिरी झेंडे यांनी केले .

याप्रसंगी विंगच्या सचिव डॉ. क्रांती खालकर, खजिनदार डॉ. सुजाता नरवडे, बालगृहाचे ट्रस्टी डॉ. अमित बडवे, कांचन रच्चा, डॉ. नीलम बागल, डॉ. मेघना पाटणकर, डॉ. संध्या कवडे, डॉ. प्राजक्ता पारधे, डॉ.सोनल बोरुडे,,डॉ हेमा सुराणा आदींसह आय एम ए लेडीज विंगच्या सदस्या उपस्थित होत्या.

सचिव क्रांती खालकर म्हणाल्या की डॉक्टर म्हणून रुग्णांची सेवा करणे हे आमचे कर्तव्य आहेच परंतु त्यासोबतच समाजातील प्रत्येक घटकाशी सामाजिक बांधिलकी जपणे आणि आनंद वाटणे हे पण अत्यंत महत्त्वाचे आहे . दिवाळीत आपण विविध प्रकारच्या फराळाचा आणि पदार्थांचा आस्वाद घेतो मात्र दिवाळीचा खरा आनंद हा वाटण्यात आहे. जेव्हा आपण आपला आनंद इतरांसोबत वाटतो तेव्हा तो द्विगुणित होतो असा मोलाचा संदेश यावेळी त्यांनी मुलांना दिला .

खजिनदार सुजाता नरवडे म्हणाल्या की परिस्थिती प्रत्येकाची सारखी नसते परंतु उच्च स्वप्ने सर्वांनीच पहावीत . त्यामुळे भरपूर स्वप्ने बघा त्यासाठी कठोर मेहनत घ्या नेहमी आनंदी राहा आणि आयुष्यात यशस्वी व्हा समाजापासून वंचित असलेल्या घटकांना मदत करा करून आपले आयुष्य उज्वल करा असे ते म्हणाल्या.

उपक्रमासाठी डॉ. कांचन रच्चा यांचे मार्गदर्शन लाभले.सुजाता नरवडे यांनी आभार मानले.

सरस्वती विद्यामंदिरच्या विद्यार्थ्यांची प्रदूषणमुक्त दिवाळीची शपथ; फटाक्यांना नकार, पर्यावरण संवर्धनाचा स्वीकार

विद्यार्थ्यांचा पर्यावरण रक्षणाचा संकल्प । लहान वयापासूनच पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण होणे गरजेचे – संदीप भोर

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– दिवाळी म्हणजे आनंद, उत्साह आणि प्रकाशाचा सण! मात्र, या आनंदोत्सवात फटाक्यांमुळे होणारे वायुप्रदूषण आणि ध्वनिप्रदूषण टाळून पर्यावरणाचे रक्षण करण्याचा संदेश केडगाव येथील सरस्वती विद्यामंदिरच्या विद्यार्थ्यांनी दिला. दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर शाळेत 'प्रदूषणमुक्त दिवाळी' हा जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी फटाके न फोडता पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याची सामूहिक शपथ घेतली.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना फटाक्यांमुळे निर्माण होणारे वायुप्रदूषण, ध्वनिप्रदूषण तसेच त्याचे मानवी आरोग्य, पशुपक्षी आणि पर्यावरणावर होणारे दुष्परिणाम याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. फटाक्यांच्या आवाजामुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, आजारी व्यक्ती तसेच पशुपक्ष्यांना मोठा त्रास सहन करावा लागतो. त्याचबरोबर फटाक्यांच्या धुरामुळे हवेची गुणवत्ता खालावून आरोग्याच्या समस्या निर्माण होतात. त्यामुळे सण साजरा करताना इतरांच्या आरोग्याचा आणि निसर्गाचा विचार करणे आवश्यक असल्याचे विद्यार्थ्यांना सांगण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांनी फटाके न फोडता दिवे, पणत्या आणि पर्यावरणपूरक सजावटीच्या माध्यमातून दिवाळी साजरी करण्याचा निर्धार केला. तसेच वृक्षांचे संवर्धन करणे, परिसर स्वच्छ ठेवणे आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीचा अंगीकार करणे, याबाबतही विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यात आले.

याप्रसंगी मुख्याध्यापक संदीप भोर म्हणाले की, ''विद्यार्थ्यांमध्ये लहान वयापासूनच पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण होणे अत्यंत गरजेचे आहे. प्रदूषणमुक्त दिवाळी हा केवळ एका दिवसापुरता मर्यादित उपक्रम नसून पर्यावरणाप्रती आपली जबाबदारी ओळखण्याची संधी आहे. विद्यार्थ्यांनी स्वतः फटाके न फोडण्याचा संकल्प करण्याबरोबरच आपल्या कुटुंबीयांना आणि परिसरातील नागरिकांनाही पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्यासाठी प्रेरित करावे. निसर्गाचे रक्षण ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.

दिवाळीचा आनंद वंचित मुलांच्या चेहऱ्यावर फुलवला; स्नेहबंधतर्फे चिमुकल्यांना नवीन शर्टचे वाटप

डॉ. उद्धव शिंदे यांच्या पुढाकाराने एमआयडीसी झोपडपट्टी परिसरात दिवाळीचा आनंद द्विगुणित



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– दिवाळीचा सण म्हणजे आनंद, उत्साह आणि आपुलकीचा सण. मात्र, आर्थिक परिस्थितीमुळे अनेक गरजू कुटुंबांतील मुलांना सणाचा आनंद मनापासून घेता येत नाही. अशा वंचित मुलांच्या चेहऱ्यावर दिवाळीचा आनंद फुलविण्याच्या उद्देशाने स्नेहबंध सोशल फौंडेशनच्या वतीने एमआयडीसी परिसरातील झोपडपट्टीतील गरीब व गरजू चिमुकल्यांना नवीन शर्टचे वाटप करण्यात आले. फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांच्या पुढाकाराने हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला.

याप्रसंगी माजी प्राचार्य एकनाथ जगताप, प्रतीक डहाळे आदी उपस्थित होते. उपस्थितांच्या हस्ते लहान मुलांना नवीन शर्टचे वाटप करण्यात आले. नवीन कपडे हातात मिळताच चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद, त्यांच्या चेहऱ्यावरील निरागस हास्य आणि डोळ्यांतील चमक यामुळे दिवाळीचा खरा आनंद अनुभवायला मिळाला.

यावेळी डॉ. उद्धव शिंदे म्हणाले, की दिवाळी हा आनंद वाटण्याचा आणि माणुसकी जपण्याचा सण आहे. आपल्या आजूबाजूला अनेक गरजू मुले आहेत, ज्यांना सणासुदीला नवीन कपडे घेणेही शक्य होत नाही. अशा मुलांसोबत दिवाळीचा आनंद साजरा करणे, त्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलवणे, हीच आमच्यासाठी खरी दिवाळी आहे. समाजातील प्रत्येक घटकाने वंचित आणि गरजू मुलांच्या आनंदासाठी पुढाकार घ्यावा. सणांचा आनंद केवळ स्वतःपुरता मर्यादित न ठेवता तो गरजूंपर्यंत पोहोचविला, तर माणुसकीचे नाते अधिक घट्ट होईल.

सामाजिक बांधिलकी जपत स्नेहबंध सोशल फौंडेशनच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबविले जात असून, गरजू आणि वंचित घटकांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्याचा प्रयत्न यापुढेही सुरू राहणार असल्याचे डॉ. शिंदे यांनी सांगितले.

सरिता मुंडे यांना आदर्श कार्यगौरव पुरस्कार प्रदान

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



नेवासा– पाथर्डी तालुक्यातील नांदूर निंबादैत्य येथील जय भगवान युवा प्रतिष्ठानचे वतीने यंदाचा राज्यस्तरीय आदर्श कार्यगौरव पुरस्कार भानसहिवरे (ता. नेवासे) येथील मंडलाधिकारी सरिता मुंडे यांना नुकताच संत-महंतांसह मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला.

नांदूर निंबादैत्य येथे जय भगवान युवा प्रतिष्ठानचा आदर्श कार्यगौरव पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला. त्याप्रसंगी महसूल विभागाचे माध्यमातून समाजासाठी आदर्श व उत्कृष्ट काम करणाऱ्या भानसहिवरे येथील मंडलाधिकारी सरिता मुंडे यांना आदर्श कार्यगौरव पुरस्कार सामाजिक कार्यकर्ते व प्रसिद्ध रिलस्टार सिद्धेश लोकरे,राणेगाव येथील हनुमान संस्थानचे प्रमुख महंत केशव महाराज शास्त्री व श्रीक्षेत्र भगवानगड येथील रामदास महाराज शास्त्री यांच्या हस्ते उद्योजक बबन सांगळे यांच्या अध्यक्षतेखाली प्रदान करण्यात आला.

यावेळी भगवानगडचे विश्वस्त पांडुरंग आंधळे, बीड शांतीवनचे संस्थापक दीपक नागरगोजे, पुणे स्नेहवन संस्थेचे विश्वस्त अशोक देशमाने, कानसा-वारणा फाऊंडेशनचे राष्ट्रीय संस्थापक दीपक पाटील, शेवगावचे बीडीओ महेश दहिफळे श्रीहरी तांबडे, प्रतिष्ठानचे अध्यक्ष आदिनाथ दहिफळे, पाथर्डीचे गटशिक्षणाधिकारी सचिन राख आदी व्यासपीठावर उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. एकनाथ पालवे यांनी केले तर सूत्रसंचालन डॉ. अमोल बागुल यांनी केले.

वाहेगुरु सेवा ग्रुपच्यावतीने किराणा किट वाटपाने दिव्यांगांची दिवाळी गोड



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– दिवाळी सणाच्या निमित्ताने वाहेगुरु सेवा ग्रुप अहिल्यानगर यांच्यावतीने प्रेरणादायी समाजसेवा उपक्रम राबविण्यात आला. अंधोजन मंडळातील दिव्यांग बांधवांना सामाजिक कार्यकर्ते बबलु खोसला व निप्पु धुप्पड राकेश गुलाटी यांच्या मार्गदर्शनाखाली किराणा किटचे वाटप करून दिवाळी गोड साजरा करण्यात आला.

सिख समाजामध्ये ''सेवा'' (निः स्वार्थ सेवा) आणि ''लंगर'' (सर्वांसाठी मोफत अन्नदान) ही परंपरा अत्यंत पवित्र मानली जाते. त्याचबरोबर पंजाबी व सिंधी समाजातही दानधर्म, समाजसेवा आणि बंधुभाव यांना विशेष महत्त्व दिले जाते.

हा कार्यक्रम गुरुद्वारा भाई दयासिंहजी येथे दिवाळी सणाच्या निमित्ताने पार पडला. यावेळी गुरुद्वारामध्ये कीर्तन, प्रार्थना तसेच लंगर व अन्नदान महाप्रसाद भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले. अंधोजन दिव्यांग बांधवांनी आणि भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या धार्मिक व सामाजिक कार्यक्रमात सहभाग घेतला.या प्रसंगी सामाजिक कार्यकर्ते बब्बलु खोसला,निप्पु धुप्पड, राकेश गुलाटी, प्रकाश दरवे, अमर सेवानी,काकासाहेब चांदणे,रींकु वदवा, हितेश ओबेरॉय,डॉ.संदीप कळमकर,वैधनाथ कुलकर्णी,धिरज रामनानी,दिपाली काशिद,प्रदिप पंजाबी,काका खोसला तसेच वाहेगुरु सेवा ग्रुपचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

याप्रसंगी राकेश गुलाटी म्हणाले की, दिव्यांग बांधवांना दिवाळी सणा निमित्ताने दरवर्षी प्रमाणे यंदाही किराणा किट वाटप मानवतेचा संदेश देणारा उपक्रम आहे. वाहेगुरु सेवा ग्रुपच्या माध्यमातून आम्ही नेहमीच गरजू व दिव्यांग बांधवांसाठी कार्य करत राहू. याप्रसंगी अंधोजन मंडळाचे अध्यक्ष संभाजी भोर, अप्पा खोपसे, संजय घुमटकर, शाम कोकणे, गणेश जाधव यांच्यासह अनेक दिव्यांग बांधव व भगिनींनी या उपक्रमाचा लाभ घेतला.व सर्व किराणा किट देणगीदारांचा आभार मानले व आशिर्वाद दिले. सणानिमित्त सिख, पंजाबी व सिंधी समाजाच्या सेवा, समानता आणि बंधुभावाच्या विचारांचा प्रत्यय देणारा हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरला आहे. आज अंधोजन मंडळातील दिव्यांग बांधवांना किराणा किट देऊन त्यांना आधार देण्याचा छोटासा प्रयत्न केला आहे. पुढील काळातही अशा सामाजिक उपक्रमांद्वारे समाजसेवा करत राहू, हीच आमची वचनबद्धता आहे.

दिव्यांग बांधव व भगिनींनी यावेळी भावना व्यक्त करताना सांगितले की,दिवाळी सणाच्या निमित्ताने आम्हाला मिळालेली ही मदत आमच्या साठी खूप महत्त्वाची आहे. वाहेगुरु सेवा ग्रुपने केलेल्या या उपक्रमामुळे आम्हाला आधार मिळाला असून, समाजात अजूनही माणुसकी जिवंत आहे याची जाणीव झाली.

आमच्यासारख्या गरजू दिव्यांगां साठी अशा प्रकारचे उपक्रम खूप उपयोगी ठरतात. आयोजकांनी दिलेल्या मदतीबद्दल आम्ही मनःपूर्वक आभार व्यक्त करतो. भविष्यातही अशाच प्रकारे आमच्यासाठी मदतीचा हात पुढे यावा हीच अपेक्षा व्यक्त केली.

प्रभाग ११ मध्ये घंटागाडी दाखल; स्वच्छतेचा प्रश्न सुटण्यास मदत!

नगरसेवक हसनोद्दीन कट्यारे व मनीषा साळवे यांच्या प्रयत्नांना यश; मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

पैठण– पैठण नगर परिषदेकडून शहरातील स्वच्छता व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी १२ नवीन घंटागाड्या उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यापैकी प्रभाग क्रमांक ११ साठी घंटागाडी उपलब्ध झाल्याने परिसरातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. नगरसेवक हसनोद्दीन कट्यारे व नगरसेविका मनीषा स्वप्निल साळवे यांच्या विशेष प्रयत्नांतून ही सुविधा उपलब्ध झाली आहे. प्रभागातील कचरा संकलन आणि स्वच्छतेचा प्रश्न लक्षात घेऊन दोन्ही नगरसेवकांनी घंटागाडीसाठी पाठपुरावा केला होता. या घंटागाडीचे उद्घाटन

नगरसेवक हसनोद्दीन कट्यारे व नगरसेविका मनीषा स्वप्निल साळवे यांच्या हस्ते करण्यात आले. नवीन घंटागाडीमुळे प्रभागातील घराघरांतून नियमित कचरा संकलन होण्यास मदत होणार असून, परिसर स्वच्छ व सुंदर ठेवण्याच्या दृष्टीने हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

यावेळी फजलउल्ला काजी, रियाज गाजी, किरण मगरे, खाजा कुरेशी, राकेश लोंधे, आदिल कट्यारे, अमन काजी, हिशोब कुरेशी, सोनू शेख, जावेद शेख, शरिया कट्यारे, संतोष दारासिंग, फिरोज कुरेशी, खय्युम कुरेशी, तबरेज कट्यारे आदींसह प्रभागातील नागरिक उपस्थित होते. नागरिकांनी घंटागाडीचा नियमित लाभ घ्यावा, रस्त्यावर व उघड्यावर कचरा टाकू नये आणि स्वच्छता राखण्यासाठी नगर परिषदेला सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

(पान १ वरून)

आदित्य ठाकरें कडून शहर शिवसेनेच्या दुष्काळग्रस्त सहाय्यता हेल्पलाइची घोषणा

यांनी शिवसैनिकांशी अनौपचारिक संवाद साधत दुष्काळ जन्य परिस्थितीमध्ये जास्तीत जास्त मदत शेतकरी बांधवांना मदत करण्याबाबत शहर शिवसेनेच्या शिवसैनिकांना सूचना केल्या. यावेळी किरण काळे यांनी त्यांना उपक्रमाची माहिती दिली. ९०२८७२५३६८ या हेल्पलाइन क्रमांकाच्या माध्यमातून दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना शहर शिवसेना सहाय्य करणार आहे.

किरण काळे म्हणाले, अहिल्यानगर शहर हे जिल्हा मुख्यालय आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना प्रशासकीय मदतीसाठी अनेक वेळा मुख्यालयी यावे लागते. मात्र बराच वेळेला अधिकारी, प्रशासन दात देत नाहीत. अशा प्रसंगात शहर शिवसेना शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी त्या ठिकाणी सज्ज असेल. शेतकरी हा बळीराजा आहे. तो जगला तर देश जगेल. या संकटाचा आपण एकजुटीने सामना करुयात असे काळे म्हणाले.

अनाहत एक कलासृष्टी आयोजित 'द भक्ती बीट्स भजन जॅमिंग अँड फ्युजन' कार्यक्रमाला रसिकांचा हाऊसफुल्ल प्रतिसाद

जोडण्याचा अनोखा प्रयत्न या कार्यक्रमातून करण्यात आला.

ओंकार देऊळगावकर, ॲड. आनंद कुलकर्णी, संदीप कुलकर्णी, श्रेया सुवर्णपाठकी, अमृता बेडेकर, वैष्णवी कुलकर्णी,सोहम सौंदणकर, विनोद गरुड, बंटी ढोरे,अनुजा कुलकर्णी,गायत्री धनलगडे, गीतांजली सगम, अमित डोंगरे, जान्हवी देऊळगावकर,अनिकेत गोसावी, मोहिनी खोल्लम, सर्वेश खोल्लम यांनी परिश्रम घेतले.

या कार्यक्रमास नगरसेवक कुमार वाकळे,डॉ. प्रकाश व सुधा कांकरिया,मनोज झंवर, विक्रम डीडवाणिया, हर्षद भावे, अविनाश देऊळगावकर, अशोक गांधी, विलास बडवे, चंद्रकांत पंडित,किशोर कुलकर्णी,राधिका सुवर्णपाठकी,अनघा पछाडे, अभिजित अपस्तंभ आदी मान्यवर उपस्थित होते.